स्वायत्त संस्थांत नवीन व्यवस्थापन मंडळाची (BoG) स्थापन करण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१३/(१२९/१३)/तांशि-२**
**मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : १३ जानेवारी, २०१६**

**संदर्भ :** १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक डब्ल्यूबीपी २०१०/(२१८/१०)/ तांशि-२, दिनांक २० एप्रिल, २०११
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक डब्ल्यूबीपी २०१०/(२१८/१०)/ तांशि-२, दिनांक २५ एप्रिल, २०११
३) संचालक, तंत्रशिक्षण यांचे पत्र क्रमांक डीटीई/एसपीएफयु/बीओजी/२०१३-१४/ २०९, दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१३

**प्रस्तावना :**

जागतिक बँक सहाय्यित केंद्र शासनाच्या तंत्रशिक्षणाचा दर्जा सुधार कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती या शासकीय संस्था तथा वीरमाता जिजाबाई टेक्निकल इन्स्टिटयूट, माटुंगा, मुंबई, इन्स्टिटयुट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई व श्री. गुरूगोविंदसिंगजी अभियांत्रिकी महाविद्यालय, नांदेड या अशासकीय पूर्णतः अनुदानित संस्था सहभागी झाल्या आहेत. सदर कार्यक्रमात सहभागी होताना राज्य शासनाने केंद्र शासन व जागतिक बँकेशी केलेल्या कारारनामानुसार या संस्थंचे कामकाज नियामक मंडळाद्वारा चालविण्यासाठी संदर्भ क्रमांक - १ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये व्यवस्थापन मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

तसेच सदर कार्यक्रमाच्या दुस-या टप्प्यात राज्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर या शासकीय संस्थांचा समावेश करण्यात आलेला आहे. दुस-या टप्प्यातील संस्थांचे कामकाज व्यवस्थापन मंडळाद्वारे चालविण्यासाठी उपरोक्त संदर्भ क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये व्यवस्थापन मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

तथापि, संबंधीत शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या संस्थांच्या व्यवस्थापन मंडळाचे पदसिद्ध सदस्य वगळता इतर सदस्याचा नियुक्ती कालावधी २ वर्षांचा असल्याचे नमूद केलेले आहे. त्याअनुषंगाने, सदर कार्यक्रमाच्या पहिल्या व दुस-या टप्प्यात निवड करण्यात आलेल्या संस्थांच्या व्यवस्थापन मंडळातील पदसिद्ध सदस्य वगळता इतर सदस्यांचा नियुक्ती कालावधी अनुक्रमे दिनांक २० एप्रिल, २०१३ व २५ एप्रिल,२०१३ रोजी समाप्त झालेला आहे. त्याअनुषंगाने, उक्त संस्थेतील व्यवस्थापन मंडळाची पुनर्स्थापना/नव्याने गठीत करण्याची तसेच सध्याच्या व्यवस्थापन मंडळाचा कालावधी व्यवस्थापन मंडळाची पुनर्स्थापना होईपर्यंतच्या दिनांकापर्यंत वाढविण्यास मान्यता देण्याचीही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यात कार्यरत स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयांसाठी व्यवस्थापन मंडळे स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. राज्यात कार्यरत निम्न नमुद शासकीय तथा अशासकीय पुर्नत: अनुदानित संस्थांतील नियामक मंडळे / व्यवस्थापक मंडळे बरखास्त करुन या संस्थांचे कामकाज चालविण्यासाठीच्या शासन निर्णयाच्या सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ, ब, क, ड, इ, ई मध्ये नमुद केल्या प्रमाणे नविन व्यवस्थापन मंडळांची स्थापना करण्यात येत आहे -

**"तक्ता - अ"**

| **अ.क्र.** | **जागतिक बँक सहाय्यित केंद्र शासनाच्या तंत्रशिक्षणाचा दर्जा सुधार कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यातील संस्था (ज्यांचे व्यवस्थापन मंडळ पुनर्स्थापन/नव्याने गठीत करावयाच्या आहेत अशा संस्था)** |
|---|---|
| १ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे, (शासकीय संस्था) |
| २ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती, (शासकीय संस्था) |
| ३ | वीरमाता जिजाबाई टेक्निकल इन्स्टिट्यूट, माटुंगा, मुंबई, (अशासकीय पूर्णतः अनुदानित संस्था) |

**"तक्ता - ब"**

| **अ.क्र.** | **जागतिक बँक सहाय्यित केंद्र शासनाच्या तंत्रशिक्षणाचा दर्जा सुधार कार्यक्रमाच्या दुस-या टप्प्यातील संस्था(ज्यांचे व्यवस्थापन मंडळ पुनर्स्थापन/नव्याने गठीत करावयाच्या आहेत अशाच संस्था)** |
|---|---|
| १. | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड, (शासकीय संस्था) |
| २. | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव, (शासकीय संस्था) |
| ३. | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर, (शासकीय संस्था) |

उक्त नमूद संस्थांच्या व्यवस्थापन मंडळावरील पदसिद्ध सदस्य वगळता इतर सदस्यांचा नियुक्तीचा कालावधी सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून मोजण्यात येईल आणि सदर सदस्यांचा कालावधी सर्वसाधारणपणे २ वर्षे इतका असेल. तसेच संदर्भ क्रमांक १ व २ मध्ये नमूद केलेल्या संस्थांपैकी अनुक्रमे तक्ता-अ व तक्ता-ब मध्ये नमूद केलेल्या संस्थांच्या व्यवस्थापन मंडळाच्या कालावधीस अनुक्रमे दिनांक २० एप्रिल,२०११ व दिनांक २५ एप्रिल, २०११ पासून दिनांक १२ जानेवारी,२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच शासकिय अभियांत्रिकी महविद्यालय, औरंगाबाद व गुरुगोविंद सिंगजी इन्स्टिटयुट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, नांदेड या दोन संस्थांची व्यवस्थापन मंडळे बरखास्त करण्यात येत असुन या संस्थांच्या व्यवस्थापन मंडळाच्या कालावधीस दिनांक १२ जानेवारी,२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

व्यवस्थापन मंडळांच्या बैठकांसाठी तथा संस्थेच्या निगडीत अन्य कामकाजासाठी व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष तथा सदस्य यांना महाराष्ट्र राज्याच्या सचिव स्तरावरील अधिका-यास देय असणाऱ्या प्रवासाच्या सवलती, प्रवास भत्ता व बैठकभत्ता देय राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक क्र. २०१६०११३१५०१३०५२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AVHAD PRAKASH B

Digitally signed by AVHAD PRAKASH B
DN: c=IN, o=Govt Of Maharashtra, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, cn=AVHAD PRAKASH B
Date: 2016.01.13 16:26:46 +05'30'

**(प्रकाश भा. आव्हाड)**
कार्यासन अधिकारी ,महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. मा. सचिव, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
७. मा. सचिव, आर्थिक कार्य विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली.
८. मा. सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली.
९. मा.अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
१०. संचालक, राष्ट्रीय परियोजना कार्यान्वयन एकक, एडसिल हाऊस, चतुर्थ तल, १८ अे, सेक्टर १६-ए, नोएडा (उ.प्र)
११. संचालक, अखिल भारतीय तंत्र शिक्षा परिषद, नवी दिल्ली
१२. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३. संचालक, वीरमाता जिजाबाई टेक्निकल इन्स्टिटयूट, माटुंगा, मुंबई
१४. संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे
१५. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड
१६. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव
१७. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर
१८. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती
१९. सर्व विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण
२०. प्राचार्य, सर्व शासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये
२१. प्राचार्य, सर्व शासकीय अनुदानित तंत्रनिकेतने
२२. सर्व विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण
२३. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई
२४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
२५. महालेखापाल (लेखापरीक्षा ) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
२६. अधिदान व लेखा अधिकारी मुंबई/ निवासी लेखा परीक्षा अधिकारी

२७. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापिठ, लोणेरे, रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा
२८. कुलसचिव,सर्व विद्यापीठे
२९. उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व कार्यासने
३०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क मंत्रालय, मुंबई
३१. अवर सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
३२. निवड नस्ती - तांशि-२

## परिशिष्ट - अ

शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०१३/(१२९/१३)/तांशि-२, दि. १३ जानेवारी, २०१६ चे सहपत्र

## शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे

## व्यवस्थापन मंडळ

| | | |
|---|---|---|
| अ. | अध्यक्ष | श्री. एफ.सी. कोहली, संस्थापक उपाध्यक्ष, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, मुंबई. |
| ब. | राज्य शासनाव्दारा नियुक्त | १. श्री. विकास पाटील, एम.डी. सावी इन्फ्रास्टक्चर ॲन्ड प्रॉपर्टीज, पुणे<br>२. डॉ. राजेंद्र जी. हिरेमठ, चेअरमन, सिनर्जी इन्फॉसिस मॅनेजमेंट प्रा.लि. पुणे. |
| क. | राज्य शासनाचा प्रतिनिधी | पदसिध्द सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई अथवा त्यांचे प्रतिनिधी |
| ड. | विद्यापीठ अनुदान आयोगाचा प्रतिनिधी | ----- |
| इ | संबंधित विद्यापीठाचा प्रतिनिधी | ------ |
| ई. | शिक्षकांचे प्रतिनिधी | प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांचे सेवाज्येष्ठता विचारात घेउन कमाल दोन या संख्येत मर्यादित |
| फ. | सचिव | पदसिध्द संस्थेचा संचालक/प्राचार्य |

## परिशिष्ट - ब

शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०१३/(१२९/१३)/तांशि-२, दि. १३ जानेवारी, २०१६ चे सहपत्र

## <u>शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती</u>

## व्यवस्थापन मंडळ

| | | |
|---|---|---|
| अ. | अध्यक्ष | श्री. संजय जाधव,एम.डी., जाधव गियर्स, अमरावती. |
| ब. | राज्य शासनाव्दारा नियुक्त | १. श्री. कुणाल टिकले<br>२. श्री. मोहम्मद झुबेर, उप प्राचार्य, पोटे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, अमरावती. |
| क. | राज्य शासनाचा प्रतिनिधी | पदसिध्द सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई अथवा त्यांचे प्रतिनिधी |
| ड. | विद्यापीठ अनुदान आयोगाचा प्रतिनिधी | ------- |
| इ | संबंधित विद्यापीठाचा प्रतिनिधी | ------ |
| ई. | शिक्षकांचे प्रतिनिधी | प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांचे सेवाज्येष्ठता विचारात घेउन कमाल दोन या संख्येत मर्यादित |
| फ. | सचिव | पदसिध्द संस्थेचा संचालक/प्राचार्य |

**परिशिष्ट - क**

शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०१३/(१२९/१३)/तांशि-२, दि. १३ जानेवारी, २०१६ चे सहपत्र

## विरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिटयूट, मुंबई

### व्यवस्थापन मंडळ

| | | |
|---|---|---|
| अ. | अध्यक्ष | श्रीमती सॅण्ड्रा श्रॉफ, व्हाईस प्रेसिडेट, युनायटेड फॉस्फरस लि. |
| ब. | राज्य शासनाव्दारा नियुक्त | १. डॉ. दीपक बी. फाटक, सीएसई विभाग, आयआयटी पवई, मुंबई.<br>२. श्री. मंगेश वसंत जोशी, सीईओ, संरचना स्टक्चरल स्ट्रेथंनिंग प्रा.लि. ठाणे |
| क. | राज्य शासनाचा प्रतिनिधी | पदसिध्द सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई अथवा त्यांचे प्रतिनिधी |
| ड. | विद्यापीठ अनुदान आयोगाचा प्रतिनिधी | ------ |
| इ. | संबंधित विद्यापीठाचा प्रतिनिधी | ------ |
| ई. | शिक्षकांचे प्रतिनिधी | प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांचे सेवाज्येष्ठता विचारात घेउन कमाल दोन या संख्येत मर्यादित |
| फ. | सचिव | पदसिध्द संस्थेचा संचालक/प्राचार्य |

**परिशिष्ट - ड**

शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०१३/(१२९/१३)/तांशि-२, दि. १३ जानेवारी, २०१६ चे सहपत्र

## शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड

## व्यवस्थापन मंडळ

| | | |
|---|---|---|
| अ. | अध्यक्ष | डॉ. अशोक खाडे, एम.डी. डीएएस ऑफशोअर इंजिनियरिंग, प्रा.लि. नवी मुंबई. |
| ब. | राज्य शासनाव्दारा नियुक्त | १. श्री. हणमंत गायकवाड, चेअरमन ॲन्ड एम डी., बी.व्हि.जी. इंडीया लि., चिंचवड- पुणे.<br>२. श्री. नरेंद्र ऊर्फ एकनाथ लक्ष्मण कुलकर्णी, डी एम ई, इलको इंजिनियरिंग इचलकरंजी. |
| क. | राज्य शासनाचा प्रतिनिधी | पदसिध्द सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई अथवा त्यांचे प्रतिनिधी |
| ड. | विद्यापीठ अनुदान आयोगाचा प्रतिनिधी | ------- |
| इ. | संबंधित विद्यापीठाचा प्रतिनिधी | ------- |
| ई. | शिक्षकांचे प्रतिनिधी | प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांचे सेवाज्येष्ठता विचारात घेउन कमाल दोन या संख्येत मर्यादित |
| फ. | सचिव | पदसिध्द संस्थेचा संचालक/प्राचार्य |

**परिशिष्ट - इ**

शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०१३/(१२९/१३)/तांशि-२, दि. १३ जानेवारी, २०१६ चे सहपत्र

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव

## व्यवस्थापन मंडळ

| | | |
|---|---|---|
| अ. | अध्यक्ष | श्री. ए. बी. जैन, उपाध्यक्ष, जैन इरिगेशन लिमिटेड, जळगांव. |
| ब. | राज्य शासनाव्दारा नियुक्त | १. श्री. भालचंद्र पाटील<br>२. श्री. संजय बिर्ला |
| क. | राज्य शासनाचा प्रतिनिधी | पदसिध्द सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई अथवा त्यांचे प्रतिनिधी |
| ड. | विद्यापीठ अनुदान आयोगाचा प्रतिनिधी | ------- |
| इ. | संबंधित विद्यापीठाचा प्रतिनिधी | ------ |
| ई. | शिक्षकांचे प्रतिनिधी | प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांचे सेवाज्येष्ठता विचारात घेउन कमाल दोन या संख्येत मर्यादित |
| फ. | सचिव | पदसिध्द संस्थेचा संचालक/प्राचार्य |

## परिशिष्ट - ई

शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०१३/(१२९/१३)/तांशि-२, दि. १३ जानेवारी, २०१६ चे सहपत्र

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर

## व्यवस्थापन मंडळ

| | | |
|---|---|---|
| अ. | अध्यक्ष | डॉ. एन. एस. चौधरी, संचालक ॲन्ड प्राध्यापक, व्हि.एन.आय.टी. नागपूर. |
| ब. | राज्य शासनाव्दारा नियुक्त | १. श्री. रामपाल सिंह, सचिव, बिल्डर्स असो. चंद्रपुर.<br>२. श्री. प्रभाकर दिवसे, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता, चंद्रपुर |
| क. | राज्य शासनाचा प्रतिनिधी | पदसिध्द सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई अथवा त्यांचे प्रतिनिधी |
| ड. | विद्यापीठ अनुदान आयोगाचा प्रतिनिधी | ------ |
| इ. | संबंधित विद्यापीठाचा प्रतिनिधी | ------ |
| ई. | शिक्षकांचे प्रतिनिधी | प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांचे सेवाज्येष्ठता विचारात घेउन कमाल दोन या संख्येत मर्यादित |
| फ. | सचिव | पदसिध्द संस्थेचा संचालक/प्राचार्य |

-*-*-*-*